ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

VOLUME - VII ISSUE - I JANUARY - MARCH - 2018 AURANGABAD

*Peer Reviewed Referred and UGC Listed Journal*

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

| IMPACT FACTOR / INDEXING |
|---|
| 2017 – 5.2 |
| www.sjifactor.com |

✦ EDITOR ✦

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**

M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

✦ PUBLISHED BY ✦

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Assist Professor
Lal Bahadur Shastri Sr College
Partur Dist. Jalna (M.S.)

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | डॉ. बाळासाहेब बाबुराव लिहिणार | व्यंकटेश मांडगूळकर यांच्या कथेची वैशिष्ट्ये | ९३-९५ |
| २४ | डॉ. प्रा. बालाजी नागटिळक | शाहू महाराजांचे सामाजिक कार्याचे स्वरूप : एक चिंतन | ९६-१०० |
| २५ | प्रा. नारायण पांचाळ | भारतीय शेतीक्षेत्रावर हवामान बदलाचा परिणाम | १०१-१०८ |
| २६ | प्रा. डॉ. शाम कदम | महात्मा गांधीचे महिलांच्या सुधारणा विषयक विचार | १०९-११२ |
| २७ | प्रा. डॉ. प्रतिभा अहिरे | दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचा समाजशास्त्रीय अभ्यास (विटा गाव, कन्नड तालुका) विशेष संदर्भात | ११३-११६ |
| २८ | डॉ. बाळासाहेब कोंडिबा जाधव | ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण करणारी कथा : चिकाळा | ११७-१२१ |
| २९ | डॉ. अशोक गणपतराव पाठक | तत्वज्ञानी तुकाराम | १२२-१२५ |

**HINDI**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | डॉ. आर. जी. बम्बोले | विनोबाजी का ब्रम्हचर्य एक अध्ययन | १-४ |
| २ | दुर्गा प्रसाद सिंह | मार्कंडेय की कहानियों में भूमि-समस्या | ५-८ |
| ३ | डॉ. विजयप्रसाद के. अवस्थी | भारतीय शिक्षा प्रणाली: कल आज और कल | ९-१४ |
| ४ | इंदिरा रजेसिंग गिरासे<br>डॉ. कुमार भुजंगराव कदम | वीर शिरोमणी, अगम्य साहस और शौर्य का प्रतिक, स्थापत्यकला का जनक – महाराणा कुंभा | १५-१६ |
| ५ | डॉ. वन्दना चौबे<br>अमित गंगानी | गंगानी परिवार के आधर स्तंभ – पं. कुन्दनलाल गंगानी | १७-१९ |
| ६ | प्रा. अरूण वामन आहेर | विष्णु प्रभाकर (अर्द्धनारीश्वर के विशेष संदर्भ में) | २०-२२ |

२१

# तत्वज्ञानी तुकाराम

**डॉ. अशोक गणपतराव पाठक**
मराठी विभाग, लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर, ता. परतूर, जि. जालना.

संत तुकारामांची कविता म्हणजे मराठी कवितेचं प्रतिनिधित्व करणारी कविता हे समीकरण आज सगळ्यांनी मान्य केलेलं आहे. जागतिक पातळीवरही आज तुकारामांची कविता मराठीची एक वेगळी ओळख सांगणारी कविता ठरली आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत तुकाराम या संतकवींनी मराठी समाजाचे भावजीवन घडविले आहे. यात संत तुकाराम हे अशा जागी उभे आहेत की, ज्या ठिकाणाहून मराठी मनाची स्थिती आणि गती यांच्या खऱ्या स्थित्यंतराला सुरुवात होते आहे. एकूणच मराठी मनाच्या निर्मळ अशा भावजीवनाच्या घडणीच्या बाबतीत तुकारामांच्या कवितेचा वाटा हा खूप मोठा आहे. मध्ययुगीन कवितेला त्यांनी तोलून धरले आहे. हाच धागा धरुन आधुनिक कवींनीही आपला काव्यप्रवास केलेला आहे.

तुकारामांच्या कवितेला असा श्रेष्ठ दर्जा निर्माण होण्यामागे जी कारणे आहेत त्यातले सर्वात महत्वाचे कारण म्हणजे त्यांचा प्रामाणिकपणा या प्रामाणिकपणामुळेच कुठलाही आडपडदा न ठेवता त्यांनी आपले सगळे व्यक्तीमत्व साकारले आहे. आपल्याला आलेले अनुभव त्यांनी जगासमोर सहजच मांडले आहेत. 'रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग' ही उक्ती केवळ आध्यात्मिक नाही तर ती त्यांच्या स्वत:च्या आयुष्यातही अनुभवाला आलेली आहे. 'जात नाही ती जात' असा जो अनुभव आजही आपल्याला जाणवतो तो तुकारामांनीही आपल्या अभंगातून मांडलेला दिसतो. अहंकारापेक्षा खरे जीवन किती महत्वाचे आहे हे ते पुढील अभंगातून सहज मांडतात.

'बरा कुणबी केलो । नाही तरी दंभेचि असतो मेलो ॥१॥
भले केले देवराया । नाचे तुका लागे पाया ॥
विद्या असती काही तरी । तरी पडतो अपायी ॥२॥
सेवा चुकतो संताची । नागवण हे फुकाची ॥३॥
गर्व होता ताठा । जातो यमपंथे वाटा ॥४॥
तुका म्हणे थोरपणे । नरक होती अभिमाने ॥५॥'

आपल्याला उच्चवर्णीयांची विद्या नाही याचे तुकारामांना खूप समाधान आहे. या विद्येमुळे आपल्याला विठ्ठलाची खरी भक्ती करता आली नसती कारण आपण अहंकारी झालो असतो. या अहंकारामुळे माणसातला माणूस मेला असता पण आपण कुणबी झाल्याने तो धोका नाही. तत्कालीन उच्चवर्णीयांची तुकाराम भंबेरी उडवितात त्यांच्यातला खोटेपणा उघडा पाडतात.

या जगाचा त्यांना जो सुख आणि दु:खाविषयीचं तत्वज्ञान तुकारामांच्या अनेक अभंगातून व्यक्त झालेलं आहे. अनुभव आला त्यातूनच हे तत्वज्ञान साकारलेलं आहे.